# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

## (अर्थसंकल्पीय विशेष सभा)

**( दिनांक 29.03.2017 रोजीची सर्वानुमत तहकुब करण्यात आलेली )**

शनिवार, दि. 01.04.2017 रोजी सकाळी 11.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची अंदाजपत्रकीय विशेष सभा महानगरपालिकेच्या कै. शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | कल्याण बालाजी दत्तराव |
| सातेलीकर श्रीनिवास आशन्ना | पवळे उमेश देवराव |
| कोकाटे नागाबाई भुजंगराव | चव्हाण आनंद शंकरराव |
| फारुख अली खाँ इलीयास खाँ | अंजुम बेगम शेख अफरोज |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | भवरे किशोर दामोधर |
| कदम शीला सुनील | प्रमोद मुरलीधराव खेडकर |
| वाजेदा तबस्सुम अथर अली खाँ | स.जानी म.कासीम |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश |
| जाधव जयश्री आनंद | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | जिंदम पार्वती व्यंकटेश |
| उमरेकर अशोक रावण | मुदिरज कमलबाई रामस्वामी |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | सलिमा बेगम नुरुल्लाखान |
| गाडगे शंकर जयवंतराव | गायकवाड अंजली सुरेशराव |
| देशमूख बालासाहेब गंगाधराव | गफारखान गुलाम महमंद खान |
| अनुजा अमितसिंह तेहरा | शर्मा पुष्पाताई राजेश |
| गिल सरजितसिंध पंजाबसिंघ | अ.हबीब अ.रहिम बागवान |
| बिपाशा बेगम स. वलीओद्दीन | अब्दुल फसीया फिरदोस |
| अ.सत्तार अ.गफुर | आसीया बेगम अ.हबीब बागवान |
| स.शेर अली स.महेबुब अली | इशरत फातेमा अ.शमीम |
| कुरेशी चाँद पाशा खाजा | तेहसीन बेगम अ.समद |
| फारुख हुसेन कासीम साब | राखेवार सतिष शेषप्पा |
| चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस | अ.लतिफ अ.मजीद |
| गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल | सुदर्शना महेश (बाळु) खोमणे |
| बावजीर शेख हबीब शेख अब्दुल | रावत दिपकसिंह काशिनाथसिंह |
| ठाकुर अन्नपुर्णा जम्मुसिंह | सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक रमेशराव सौदे | देशमुख मंगला गजानन |
| सौ.ललिता मुंकुंदराव बोकारे | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजीराव |
| येवनकर विजय हिराचंद | कदम विश्वास बालाजी |
| अड.बन शाम वामनराव | अल केसरी हसन बिन उमेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर हे होते तसेच श्री समिर उन्हाळे आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त, विकास, श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ. सौ. सुमती ठाकरे, प्र. मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री गिरीष कदम, कार्यकारी साबांवि, श्री सुग्रीव अंधारे कार्यकारी अभियंता पापु, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातील नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामूहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर.** सर्वानुमते तहकुब केलेली विशेष अर्थसंकल्पीय सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**विषय क्र. १ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या अधिन राहून मा. आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी सादर केलेले व स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार केलेल्या शिफारशी नुसार सालसन २०१६-२०१७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सालसन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करणे बाबत.

**विरोधी पक्षनेता** आपला टॅक्स 37 कोटीपेक्षा वर जात नव्हती, आपण या वर्षीचा टॅक्स चांगला गोळा केला आहे. मालमता कराची वसुली ही उप आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्थ कर्मचारी यांनी केली आहे. ही वसुली मा. आयुक्त साहेबांच्या मार्गदर्शनाप्रमाणे केली आहे त्यासाठी मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो तसेच उप आयुक्त कंदेवार साहेबांनी रु. 55.5 कोटीची वसुली केली असल्याने त्यांचेही अभिनंदन करतो त्यांचा सभागृहात पुष्पगुच्छ देवून सत्कार करावा. मी मा. महापौर, उप महापौर, यांनी सत्कार करावा.

**स. शेर अली** मालमत्ता कराची वसुली केलेल्या सर्व टीमचे पुष्पगुच्छ देवून सत्कार करावा यावर्षी 55.50 कोटीची वसुली केली आहे. त्या सर्व टीमचे अभिनंदन करतो. करावा, आणि श्री कंदेवार उपआयुक्त यांना दोन वार्षीक वेतन वाढी देण्यात याव्यात त्यांनी चांगली वसुली केली आहे. त्यांनी वसुलीचे काम अत्यंत चांगले केले आहे त्यामुळे त्यांचा सभागृहात सत्कार करावा.

**स. सरजीतसिंघ गील** आता खेडकर साहेबांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्याला माझे अनुमोदन आहे. मालमत्ता कराची वसुली मा. आयुक्त साहेबांच्या मार्गदर्शनाखाली श्री संतोष कंदेवार उपायुक्त यांनी यावर्षी रु55 कोटीची वुसली केली आहे त्यांचे याठिकाणी अभिनंदन करतो. परंतू एका वसुली लिपीकांने 30 हजार रुपयाची मागणी केलेली आहे. तुमचे पैसे कमी करुन देतो म्हणुन पैशाची मागणी करतात अशा कर्मचा-यावर तात्काळ कार्यवाही करावी. त्यांना निलंबीत करावे. जशी ढवळे यांच्यावर कार्यवाही केली तशी या कर्मचा-यावर देखील कार्यवाही करावी.

**अशोक उमरेकर** हा जो प्रकार घडला आहे तो अत्यंत वाईट आहे. माझ्या वार्डातही असेच वसुली लिपीक करीत आहेत. मी त्यांना बोलावून सांगीतले की अशा गोष्टी घडल्या नाही पाहीजे, संबधीत कम्रचा-यावर कार्यवाही करण्यात यावी. कंदेवार साहेबांनी वसुली केली ती अत्यंत उल्लेखनीय आहे 37 कोटी पेक्षा जास्त निधी आजपर्यंत मनपाने वसुल झालेला नाही. 55 कोटीची वसुली त्यांनी केल्यामुळे त्यांचे मी अभिनंदन करतो त्यांच्या टीमचेही अभिनंदन करतो.

**दिपकसिंह रावत** श्री कंदेवार साहेबांनी जी वसुली केली आहे ती चांगली आहे. त्यांच्यासोबतचे क्षेत्रिय अधिकारी यांनी सुध्दा वसुली केल्याने त्यांचेही अभिनंदन. शहरात प्रशासन कसे राबवावे हे श्री कंदेवार साहेबांनी दाखवून दिले आहे. आपण अधिका-याची प्रशंसा केली की ते अधिका-याला घेवून जातात. आपण जास्त प्रशंसा केली पाहिजे नाही. मी आयुक्तांचे सुध्दा अभिनंदन करतो त्यांच्याच मार्गदर्शनाने वसुलीत वाढ झालेली आहे

**सौ. अनुजा तेहरा** श्री कंदेवार साहेब व त्यांच्या टीमचे अभिनंदन, या टीमचे प्रमुख महापौर मॅडम, आयुक्त यांचेही अभिनंदन करते. या टिमचे प्रमुख या महापौर आहेत त्या मुळे त्यांचे विशेष अभिनंदन करते

**अभिषक सौदे** श्री कंदेवार व टीमचे अभिनंदन करतो. माझ्या भागात पावसाळयात खुप समस्या निर्माण होतात. त्यामुळे माझ्या भागाकडे दुर्लक्ष करु नये. अविकसीत भागासाठी बजेटमध्ये तरतुद करावी.

**फारुख अली खाँ** श्री कंदेवार यांचे स्वागत करुन अभिनंदन करतो. टिमचा कॅप्टन हा चांगला असला की, मॅच जिंकणे सोपे असते. त्यामुळे मी आयुक्त, महापौर यांचे देखील अभिनंदन करतो. रात्रीच्या बारावाजेपर्यत त्यांनी वसुलीचे काम केले आहे. ही वसुली झाल्यामुळे आमच्या प्रभागातील 40 लाखाचे कामे करावीत. आम्हाला निवडणूकीला सामोरे जावे लागते. आसरानगरच्या कब्रस्तानचा विषय मी यापुर्वीचे मांडलेला होता. महापौर साहेब आपण आवश्वासन दिले होते की, हे काम आठ दिवसात होवून जाईल.

**रामनारायण काबरा** बिल भरले असतांना शास्ती कशासाठी देण्यात येत आहे. बिल कलेक्टरला आम्ही पैसे पुन्हा बिल वाढून आले मी चौकशी केली असता बिल कलेक्टर म्हणतो की, साहेब सगळयांचे बिल वाढून आलेले आहेले आहे. जर नागरीकांना पैसे भरुनही बिलात त्या रक्कमेचा समोवश होत असेल तर ही बाब योग्य नाही. संगणकामध्ये काय सुधारणा करावयाच्या त्या त्वरीत करण्यात याव्यात.

**सौ. ललिता बोकारे** श्री कंदेवार साहेबांनी चांगली वसुली केली त्यांचे मी अभिंनदन करते सुंदर शहर चांगले शहर. आयुक्त साहेबांच्या मार्गदर्शनाने वसुली झालेली आहे. सध्या पाणी पुरवठा हा रोग युक्त होत आहे त्यामुळे पाणी पिण्याचे शक्य नाही. शहरात मोठया प्रमाणात कच-याचे ढिग आहेत कोणीही कचरा उचलण्यास येत नाही. मागील चार महीण्यापासुन सफाई कामगाराचे वेतन बंद आहे.

**आंनद चव्हाण** आतापर्यंतची जी वसुली झाली आहे तो निधी वार्डासाठी वापरण्यात यावा अशी सभागृहास माझी विनंती आहे.

**गफार खान** सगळयांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे. एक जानेवारी 2017 ला शासन निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाचे मी अभिनंदन करतो की 600 फुटापर्यंतच्या अनाधिकृत बांधकाम शास्ती या वगळलेल्या आहेत. आमच्या मुस्लीम समाजात पडदा ठेवण्याची पध्दत आहे त्या एरीयापर्यंत देखील मनपाने अनधिकृत बांधकाम म्हणुन शास्ती लावलेली आहे. 600 फुट ते 1000 फुटापर्यंत बांधकाम केले त्यांना 50 टक्के शास्ती ही जी योजना सुरु झाली त्यानुसार सायंकाळी सात वाजताच्या नंतर वसुली मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे. माझ्या एरीयात उपायु , सहाय्यक आयुक्त, क्षेत्रिय अधिकारी वसुली लिपीक यांनी वसुली केली आहे. माझ्या भागातुन 2 ते 3 लाखापर्यंत वसुली होत आहे. कंदेवार हे आमचे अधिकारी नसल्याने त्यांच्या वार्षीक वेतनवाढीचा प्रस्ताव मंजूर करुन देण्यात यावा. बजेट पास करण्यासाठी विलंब होवू नये या करीता संगळयाच

पदाधिका-याने आपले मत मांडावे अशी विनंती आहे हे बजेट लवकरात लवकर पास करुन त्यांची अमंलबजावणी करण्यात यावी.

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** मनपाची आर्थिक परिस्थीती डबघाईला असतांना श्री कंदेवार व टिमने चांगली वसुली केली त्यांचे अभिनंदन करतो. येणा-या काळात राम नवमी, भिमजयंती असे सण आहेत. कर्मचा-यांच्या दोन महीण्याच्या पगारी त्वरीत करण्यात याव्यात. एटुझेड कंपनीने 6 लाखा जनतेला वेठीस धरले आहे या कंपनीला तत्काळ गुन्हा दाखल करुन ब्लॅक लिस्टमध्ये टाकावे.

**अब्दुल सतार** श्री कंदेवार साहेबांचे अभिनंदन करतो आणि ज्यांनी पैसे भरले त्या जनतेचे आभार व्यक्त करतो. सर्वात प्रथम हा काळ नोट बंदीचा होता. मोदीजींचे आपण अभिनंदन केले पाहिजे. कारण त्यामुळेच आपली एवढी वसुली झाली आहे. आपला 155 कोटी कर आहे. त्यातुन आपण फक्त 55 कोटी वसुल केले यात कोणती मोठी गोष्ठ आहे. वसुली केली पण वार्डाच्या विकासाचे काय व पगारीवर कीती खर्च होत आहे याचाही खुलासा दिला पाहिजे. आपल्या खिशात पैसे किती ओत याचाही आपण खुलासा केला पाहीजे. आमचे श्री कुरुंदकर साहेब होते त्यांनी मनपा सोडून गेले तेव्हा त्यांनी 14 कोटी रुपये शिल्लक ठेवले होते. गुत्तेदाराचे थोडे पेमेट केले तर उपकार समजायचे कारण नाही आपल्या जवक काय काम आहे हे सांगावे कर्मचारी बसून राहत आहेत. आपल्या कडे कोणत्या योजना चालू आहेत. डॉक्टरांची पगार 25 हजार वरुन 40 हजार करण्यात आली आहे. मेटन्सचे काम होत नाही याचा खुलासा करण्यात यावा. एक वसुली लिपीक 30 हजाराची मागणी करतो. यामुळे मनपाची बदनामी होते. येणा-या 6 महीण्यात आमचे निवडणुका आहेत यातील 15 कोटी बाजूला काढून वार्डाचा विकास करावा आम्ही निवडून आलो आहोत त्या वार्डाचा विकास करावा. सगळयाचे अभिनंदन करण्यात यावे. शासनाने सात कोटी पाठवले त्याचा काय विनीयोग करणार तेही सांगावे. शासनाकडून 4.5 कोटीचे अनुदान आहे त्याचे काय केले याचा खुलासा करावा.

**महापौर** उपायुक्त कंदेवार यांचे आपण वसुली केल्यामुळे अभिनंदन करणार आहोत तसेच वसुली दरम्यान जे काही गैरव्यवहार झालेला आहेत. त्यांच्यावर आयुक्तांनी कडक कार्यवाही करावी. दोषी आढळले असतील तर त्यांना त्वरीत निलंबीत करावे. आपण सुट देत असतात तर त्या मालमता धारकाकडून पैसे घेता हे योग्य नाही. शहरात घटना होवू नये यासाठी शहराची प्रतीमा मलीम होवू नये, याकरीता कडक कार्यवाही करावी.

**गफार खान** सौ.शिला कदम, व सौ. ललिता बोकारे मॅडम यांची महीला व शिक्षण बाल कल्याण समिती सभापती व उप सभापती पदी निवड झाली असल्याने त्यांचे सभागृहात स्वागत करावे.

**आनंद चव्हाण** सौ. शिला कदम, व सौ. ललिता बोकारे मॅडम यांची महीला व शिक्षण बाल कल्याण समिती सभापती व उप सभापती पदी निवड झाली असल्याने त्यांचे सभागृहात स्वागत करावे यास माझे अनुमोदन आहे.

(मा.महापौर, मा.आयुक्त, उप महापौर विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता यांनी अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार केला. तसेच सभापती व उप सभापती यांचाही सत्कार केला)

**विरोधी पक्षनेता** शहरात चार दिवसापासुन स्ट्रीट लाईट बंद आहे, कच-याचे ढिगारे झाले आहेत. त्या कंत्राटदारावर काही कार्यवाही करणार की नाही हे सांगा आपले अधिकारी काय काम करतात . एमएससीबी लाईट बंद करते आणि आपण काहीच कार्यवाही करत नाही हा काय प्रकार आहे.

**डॉ.करुणा जमदाडे** माझ्यावतीने / प्रभागाचे वतीन सर्वाचे स्वागत करते सिडकोची कालची वसुली 69 लक्ष रुपये झालेली आहे. शहरात चांगली वसुली झाली. त्याबाबत मी महापौराचे अभिनंदन. जनतेचेही अभिनंदन करते. जनतेनही मनपाला सहकार्य केले आहे. आपण नागरीकांना कीती सोयी करुन देतो. हे महत्वाचे आहे. दोन-तीन महीण्यापासुन एटुझेडच्या लोकांना पगार दिलेला नाही. जनतेच्या गैरसोयी मनपाकेकडून होत आहेत. यावर आपण उपाय करणार कि नाही हे सांगावे. एटुझेडचे लोक शहरासाठी काम करतात. रस्त्यावर सकाळी पाच वाजले पासुन येतात त्यामुळे शहर स्वच्छ व सुंदर दिसते. एटुझेडने या लोकांना रस्त्यावर आणले आहे, यावर उपाय करावा. चार महीण्यापासुन पेमेट झालेले नाही टाकीवर लेडीज रडत बसल्या आहेत. एजन्सीने पेमेट का केले नाही याचा जबाब त्यांना विचारु शकत नाही. महापौर/आयुक्तांचे लक्ष दयावे अशी विनंती आहे. स्वाईन ल्युव/उष्माघाताचे बळी होत आहेत. शहराकडे गांर्भीयांने लक्ष देणे गरजेचे आहे.

**अभिषेक सौदे** मागच्या वेळी मी पाण्याचा प्रश्न मांडला होता त्यात थोडी सुधारणा आहे. पिवळसर पाणी कमी झालेले आहे पण वास येणे बंद झाले नाही. याला जबाबदार कोण आहे त्याच्यावर काय कार्यवाही करणार हे सांगावे.

**रामनारायण काबरा** हे प्रश्न निर्माण होतात. बजेट आपले योग्य नाही केव्हा बेस योग्य नाही. बजेट वाढवून दिलेले आहे. पैसे जमा होत नाही तर कसे चालणार हे सांगावे. मनपाने उत्पन्न किती हे पहावे वास्तविक बजेट होणे गरजेचे आहे. जो खर्च होत आहे तो कमी करण्यात यावा.

**अभिषेक सौदे** पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे त्याचा प्रथम खुलासा करावा.

गोंधळ सुरु झाला.

**अशोक उमरेकर** पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे.

सर्वानी पाण्याचा प्रश्न उचलून धरला आहे.

गोंधळ सुरु होता

**अशोक उमरेकर** शहराचे तापमान 44 पर्यंत गेलेले आहे. तीन दिवस आढ पाणी पुरवठा करीत आहोत. लोकांना पाणी मिळत नाही हा पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. बजेट कोठे पळुन जाणार नाही मी सांगतो.

**सभागृह नेता** बजेट पास करण्यात यावे. महापौरानी ठरवावे की काय महत्वाचे आहे.

पुन्हा गोंधळ सुरु झाला.

**महापौर** पाण्याच्या संदर्भातील विशेष सभा आधीच घोषीत केलेली आहे ती सभा 5 तारखेला होणार आहे.

**बाळासाहेब देशमुख(संविधान पार्टी)** मला बालू दयावयाचे नाही काय हे सांगावे मी किती वेळ थांबावे हे तरी सांगा. मी खुप वेळा पासुन बोलण्यासाठी वेळ मागत आहेत.

**महापौर** श्री बाळासाहेबांनी बोलावे. कमी वेळात आपला विषय मांडावा.

**बाळासाहेब देशमुख(संविधान पार्टी)** या अर्थसंकल्पामध्ये पाण्यासाठी सभा ठेवली आहे. पाण्यावर बोलवण्याची गाणी होत होती.

गोंधळ सुरुच होता.

(अभिषेक सौदे हे बाळासाहेब देशमुख यांच्या अंगावर आले होते.)

**स. शेर अली** आसन सोडून दुस-याच्या अंगावर धावून जाणे हे योग्य नाही.

**महापौर** 10 मिनीटीसाठी सभा तहकुब करण्यात येते. 12.10 मिनीटाला सभा तहकुब केली.

**महापौर** 12.20 मिनिटानी पुन्हा सभचे कामकाजास सुरुवात करण्यात आली.

**सरजितसिंघ गिल** सभागृहात झालेली घटना निंदनीय आहे एकमेकांच्या अंगावर मारायला गेले हे योग्य नाही. काही समस्या असल्यास महापौर, आयुक्त यांच्याकडे जावून सोडवू शकतो. आपण चांगले काम करत आहात या घटनेमुळे आपणास उत्तर दयावे लागते.

**विरोधी पक्षनेता** आपण आपसातच बोलत असतो. आपले मागण्या सभागृहात योग्य पध्दतीने करावे. फोटोग्राफरने पहील्या वेळात फोटो घ्यावे व त्यांनतर त्यांना बाहेर जाण्यास विनंती करावी. सभागृहाला विनंती आहे की, फोटोसाठी आपण हा प्रकार करु नये. आयुक्त खुलासा करायला तयार होते ही सगळी बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. श्री अभिषेक सौदेचा पाण्याचा प्रश्न असेल तसेच देशमुखाचा देखील पाण्याचा प्रश्न असेल तुम्ही 5 तारेखला बैठक लावणार आहात पाणी प्रश्नावर ती चांगली गोष्ट आहे. जे सभागृहात प्रकार घडला तो योग्य झालेला नाही.

**सभागृह नेता** आजची विशेष सभा आहे त्यामुळे पिठासन अधिकारी जो निर्णय सांगतील त्यावरच चर्चा होत असते ही अर्थसंकल्पीय सभा आहे. त्यामुळे दुस-या विषयाची यात चर्चा व्हायला नको. पिठासन अधिकारी यांनी बोलण्याची अनुमती दिली तर नागरिकांच्या विषयावार बोलता येईल. श्री सौदे यांनी महापौर जे सुचना करतील त्याप्रमाणे वागावे. सभागृहात पोटतिडकीने प्रश्न मांडावेत.

**दिपकसिंह रावत** श्री सौदे यांनी त्यांच्या वार्डाचा प्रश्न मागील सभेतही मांडण्याचा प्रयत्न केला पण त्यांचया प्रश्नावर महापौराकडून प्रतिसाद मिळालेला नाही त्यामुळे त्यांनी त्यांच्या प्रश्न पोटतिडकीने मांडण्याचा प्रयत्न केला ही विशेष अर्थसंल्पीय सभा आहे. याच्या अटी व शर्ती असतात. श्री सौदे यांनी जागा सोडून श्री बाळासाहेबांच्या अंगावर गेले हे चुक आहे. भविष्यात असे होवू नये अशी आमची इच्छा आहे. पाण्यासाठी आपण 5 तारखेला विशेष बोलावणार आहोत तेव्हा हा विषय सविस्तर मांडणी करावा.

**अशोक उमरेकर** एक नगरसेवक बोलत असतांना दुस-याने बोलू नये ही बाब सत्य आहे जी घटना घडली ती निंदनीय असुन ते सभागृहास शोभत नाही. श्री सौदे यांनी श्री बाळासाहेबांची माफी मागावी. आम्ही या ठिकाणी काही फोटोशेसनला येत नाही आम्ही जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी या ठिकाणी आलेलो आहोत.

**अब्दुल सत्तार** मागील 25 वर्षापासुन आम्ही सदस्य आहोत. हा जो प्रकार घडला तो योग्य नाही 25 वर्षात असे प्रकार आम्ही कधी पाहिले नाहीत भविष्यात असे होवू नये अशी आमची अपेक्षा आहे. मी कोणाचे नांव होत नाही येणा-या 6 महिण्यात निवडणूका आहेत त्याठिकाणी या फोटोचा वापर करावयाचा आहे. आम्ही सभागृहात काय काम करतो. हा सभागृहाचा अपमान आहे. तुम्हाला जाग्यावर बसुन प्रश्न मांडण्याचा अधिकार आहे. लोकांच्या अंगावर जाण्याचा नाही. आम्हाला काम करावचे नाही फक्त दाखववायाचे आहे हा प्रकार आहे. ही विशेष बैठक आहे बजेटच्या संदर्भात सुचना मांडावीत.

**महापौर** उद्याच्या पेपरात छापून येते की, नेहमीप्रमाणे गोंधळाची परंपरा सभागृहात चालू असे शिर्षक लिहतात. आपण काम करण्यासाठी या ठिकाणी आलो आहोत. गोंधळासाठी नाही. लोकांच्या कामासाठी आपण या ठिकाणी आलेलो आहोत. कोणीही कोणापेक्षा कमी नाही सगळेजण अभ्यासु आहात. अभ्यास पूर्ण बोलावे अशी अपेक्षा आहे. या ठिकाणी महिला नगरसेविका आहेत याचे मान ठेवले पाहिजेत. सगळयांनी शांतता पुर्ण काम करावे असे मला सांगायचे आहे. श्री सौदे यांनी जागा सोडून श्री बाळासाहेबांच्या अंगावर गेलेले आहेत. श्री सौदे यांनीसभागृहाची माफी मागावी अन्यथा त्यांनी सभागृही सोडून बाहेर जावे असे मी त्यांना ओदशीत करते

**अभिषेक सौदे** — माझ्या वार्डातला पाण्याचा प्रश्न आहे तो प्रश्न मांडण्यासाठी मी आपणास मागच्या सभेत विनंती केली होती माझ्या वार्डात निव्वळ खराब पाणी येते. फोटोसाठी आम्ही काही करत नाही मी महापौरांच्या परवानगीने प्रश्न मांडला. 26 - 27 ला पाण्याचा प्रश्न झाला असल्याने मागील सभेत सुध्दा हया बाबत मी बोललो होतो परंतू यावर उपाययोजना झाली नाही. जनतेचे प्रश्न मांडणे चुक आहे काय हे सांगावे.

**महापौर** — आपला प्रश्न गंभीर आहे. त्याबाबत संबंधित अधिकारी यांना सांगतो आणि आपल्या प्रभागात स्वच्छ पाणी पुरवठा करता येईल. सभागृहाची माफी मागावी.

**अभिषेक सौदे** — काही सदस्य हे म्हणाले की, फोटोसाठी हे प्रकार केले जाने याबाबत मला खुलासा करु दयावा. दुषीत पाण्याच्या संदर्भात सभागृह गंभीर नाही याबाबत मला वाईट वाटते

**सभागृह नेता** — महापौराचे आदेश मानत नाहीत त्यांना निलंबीत करावे.

गोंधळ सुरु झाला.

बजेट पास करण्यात यावे. बजेट पास.

**नगरसचिव** — बजेटचा विषय वाचून दाखवले.

**गफार खान** — मनपाच्या क्षेत्रात एकुण मालमत्ता एक लाख 9 हजार आहेत. दर वर्षी वस्ती वाढ होत आहे. त्यामुळे सन 2012 ला कर आकारणी करण्यात आली आहे. नविन इमारतीचे मालमता प्रस्तावित आहे. 2016-2017 चे वर्षापासुन लागू करुन 17-18 च्या पासुन मागली बिलात अड करावा असा प्रस्ताव आहे.सर्व सभागृहातील पक्षाचा नगरसेवकांनी कंदेवार साहेबांचे अभिनदंन केले आहे. या माझी सुचना आहे जे जे उत्पन्नचे सोर्सच आहेत फेब्रुवारी ते मार्च बसुन न करता. वर्षाच्या दर महीण्यानंतर वसुली करावी म्हणजेच मनपा लागणार खर्च भागविता येईल. एलबीटीची किती वसुली होते किती प्रकरणे राहीली आहे. याबाबत दर महिण्याला बैठकी आढावा घेण्यात यावा. 2017-17 ऐवजी 17-18 पासुनच मागणी बिल देवून त्याच वर्षापासुन मागणी करावी.एका उपायुक्तावर जबाबदारी न देता उत्तर - दक्षीण असे दोन उपायुक्तावर जबाबदारी देण्यात यावी म्हणजे वसुली चांगली होईल अशी माझी सुचना आहे. इनकम चा जे सोर्सचे आहेत ते म्हणजे बांधकाम परवानगी यात आपणास किती पैसे येणार आहेत हे या ठिकाणी दाखविले नाही. नांदेड शहरात वस्तीवाढ होत आहे. जी रक्कम ठेवले आहे त्यामध्ये आम्ही दिड पट रक्कम वसुली करु शकतो. चांगल्या दोन अधिका-यांची नेमणुक करावी. अविकसीत मागण्या रस्त्यासाठी एकही काम आपण केलेले नाही. यासाठी एका तज्ञ अधिकारी यांची कमिटी तयार करावी. शहराचा सर्व्हे करावा. प्रत्येक नगरसेवक म्हणेल की माझाही वार्ड अविकसीत आहे असे सर्वच जन म्हणणार आहेत. शहरात 25 ते 50 घराची वाढ होत आहे ती अनाधिकृतपणे होत आहे. या विकसीत भागात कार्यकारी अभियंता सांबावि/पापुवजनि असो. यासाठी यांना मागणी येते की, आमचा भाग विकसीत करुन देण्याकरीता मागणी करीत असतात. यासाठी आपल्याजवळ पैसे नसतात. या विभागाचा विकास करु शकत नाही. लोकांच्या शिव्या खाव्या लागतात. किती इमारतीचे काम झाले किती पंचनामे झाले आहेत. इमारत निरीक्षक काय करतात हे सभागृहाला माहितीच आहे. वसुली लिपीक, पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक, यांनी ज्या ठिकाणी नविन झोपडी होते त्याची माहिती कार्यालयास दयावी. त्या एरीयामध्ये सर्वासाठी घरे आपण देणार आहेत. कच्चे रस्ते, लाईटचे पोल देण्यात यावे आणि देतच आहोत. पान नंबर आठ वर ज्या नोंदी आहेत ती कामे सार्वजनिक असतील ते घेण्यात यावे जे कामे 10 लाखाचे आहेत मनपाने 150 कोटी रुपयाचे कर्ज घेतले आहे त्या कर्जाच्या मंजूरीच्या आदेशामध्ये शासन काही कर्जाच्या परतफेडीची गॅरंटी घेणार नाही असे नमुद केले आहे. त्यामुळे मनपा आयुक्तांनी ठरविल्यानुसार ही रक्कम खर्च होणार आहे काय? इदगाहच्या जागेसाठी एक कोटी रुपयाची तरतुद ठेवण्यात यावी, व्यायाम शाळेचे साहित्य खरेदीसाठी तरतूद ठेवण्यात यावी. तसेच अल्पसंख्याचा विकास करण्याच्या निधी मागणी करण्यात यावी.

**विरोधी पक्षनेता** — इतर महानगरपालिका या मालमता करावरच चालत आहेत. एका प्रभागात किमान 1500 ते 2000 मालमता असाव्यात ते दिसत नाहीत. या मालमत्ता या टॅक्स नेट मध्ये घ्यावे जेणे करुन आपल्याला आर्थिक उत्पन्न होईल. सभापती महोदयांनी इतरही सदस्याचा विचार करावयास पाहीजे होता. आम्हाला सुचना करावयास पाहीजे तसे झाले नाही केवळ स्थायी समितीच्या सभासदाचा विचार केलेला आहे. 2016-17 चे उत्पन्न बघीतले तर 144 कोटी आहे आणि आपण 6.50 कोटी रुपयाचा अर्थसंकल्प सादर करीत आहोत हे तफावत दिसत आहे. आपल्याकडून सर्व विभागाचे मिळुण 144 कोटी रुपये वसूल झालेले आहे. 40 लाख देण्याचे मान्य केले आमचे कामे करणेसाठी 15 लाख रुपये तरी देण्यात यावे. यामुळे आमचे कामे वार्डात घेतील येणा-या काळात निवडणूका आहेत. त्यामुळे कामे आतताच काढावी आयुक्तांनी सुविल्यानुसार गेल्या वर्षी स्थानिक संस्था कराचे 55 कोटी आणि त्या अगोदरच्या वर्षी 38 कोटीचे उत्पन्न दाखविले आहे. मागील वर्षी आयुक्तांनी ठेवले होते 14 कोटी आता या वर्षी त्यांनी ठेवले 40 कोटी हा निधी कोठून येणार आहे याचा खुलासा करावा. आपले उत्पन्न निवळ 144 कोटी रुपये आहे. शासनाचे अनुदान मागील दोन तीन वर्षापासून आपआपसात आले नाही. मी सभागृहातील पदाधीकारी यांना विनंती करतो. त्यांनी शासनाचे मागील तीन

वर्षाचे अनुदानाची मागणी केलेली नाही हे अनुदान मागणी करण्यासाठी एक शीष्टमंडळ मा. मुख्यमंत्री महोदयांना भेटून मागणी करावी. स्थायी समितीने रु. 15 कोटी ठेवले आहे तर प्रशासनाने रक्कम ठेवली नाही ती ठेवली नाही याचा खुलासा करावा. बीओटी तत्वावर मंगल कार्यालय बांधण्यासाठी आयुक्तांनी ठेवले 7 कोटी रुपये आणि स्थायी समितीने ठेवले 15 कोटी रुपये यात देखील वाढ करण्यात आलेली आहे. व्यापारी यांच्याकडून प्रशासनाने 2 कोटी रुपये ठेवले आणि स्थायी समितीने 11 कोटी ठेवले आहे यात देखील तफावत आहे एवढे शहरात व्यापारी आहेत काय. परवाना फीस या करीता मा. आयुक्त साहेबांनी ठेवले आहे रु.2 कोटी आणि स्थायी समितीने ठेवले पावने सहा कोटी रुपये यात ही पावने चार कोटी रुपयाची तफावत आहे. सभापती यांनी सिडको स्मशान भुमीसाठी निधी ठेवला नाही त्यासाठी स्मशान भुमीसाठी आयुक्तांनी एक कोटी रुपये ठेवले आहे यात सभापती यांनी रुपये 7 कोटी रुपये ठेवले आहे यातही 6 कोटीची तफावत आहे. महापुरुषाच्या पुतळयासाठी स्थायी समीतीने रु.4 कोटी ठेवले आहे जे की आयुक्तांनी 2 कोटीची तरतूद ठेवली आहे यातही तफावत आहे मोकळया जागेवर बांधकाम रोखण्यासाठीनिधी ठेवला आह मला वाटते शहरात आता कोठेही मोकळया जागा राहीलेल्या नाही सर्व जागेवर अतीक्रमण झालेले आहे. शहरात मोकळया जागा नाहीत त्या जागेवर मनपा ने बांधकाम परवानगी दिलेली आहे शहरातील नागरीकांना बांधकाम परवानगी साठी येतो त्याला बांधकाम परवानगी वेळेवर दिली जात नाही लोकांना परवानगी वेळेवर दिली पाहिजे. यातुन आर्थिक नुकसान मनपाचे होत आहे जर त्याला परवानगी दिली नाही तर तो घराचे बांधकाम करुन मोकळा होतो. ही बाब मा. महापौर मॅडम आपल्या निदर्शनास आनुन देत आहे. याचा अमंलबजावणी झाली पाहीजे.

**सौ.अनुजा तेहरा** मा.सभापती स्थायी समिती यांनी प्रथमच बजेट सादर केले त्यांचे मी अभिनंदन करते. शहरात आपण एका बिल्डरला पाणी दिले आहे मी त्यांचे नांव घेत नाही पाणी न देणे अशी भुमिका नाही त्याची वसुली आपण केली पाहिजे. पाणी देतो, रस्ते देतो, विज देता व इतर सुविधा देत असतो तर अशा वेळी मनपावर आर्थिक बोजा पडतो हा बोजा कमी करावयाचा झाल्यास वसुली झाली पाहीजे. नांदेड लगलचा हददी वाढीचा प्रस्ताव विचारात घेता येईल.मनपाचे महसुली उत्पन्न कसे वाढ करता येईल याचा आपण सर्वानी विचार करणे गरजेचे आहे. वार्ड विकास निधीचे कामे करण्यासाठी आपण पाठपुरावा करतो परंतू आपले उत्पन्न नाही तर अशा वेळी कामे कशी होणार याचा देखील विचार होणे आवश्यक आहे.मनपाचे जास्तीत जास्त उत्पन वाढ केली पाहीजे. यापुर्वी जकातीचे उत्पन होते. नतंर एलबीटी चालू आहे. जर हे बंद झाले तर आपणास उत्पन होणार नाही. मोठ मोठे र्इमारतीचे बांध्काम शहरा लागुन झालेले आहे. याकरीता आपल्या मनपाची हदद वाढ केली पाहीजे त्यातुन आपणास होणारे महसुली उत्पन्नात वाढ होईल यासाठी शासनास हदद वाढीचा प्रस्ताव पाठविण्यास विनंती आहे.

**उमेश चव्हाण** विरोधी पक्षनेता यांनी म्हणाले की, सभापती यांनी स्थायी समितीच्या सदस्यांच्या वार्डासाठीच पैश्याची तरतूद केली आहे. त्यांनी सिडकोसाठीच निधी ठेवला नाही तर त्यांनी सर्व शहराची विकासाची कामे करण्याकरीता निधी ठेवला आहे. व्यवसाय परवाना धारकांचे उत्पन आयुक्तांनी दोन कोटी ठेवले आणि स्थायी समितीने त्यात वाढ केली कारण एलबीटीचे नोंदणी गृहीत धरुन ठेवले असतील परंतू प्रत्यक्षात जास्त व्यापारी शहरात आहेत त्यांची नोंदणी होणे गरजेचे आहे. त्यामुळे वाढ करण्यात आली आहे. शहराची आर्थीक परीस्थिती सुधार करण्यासाठी आपण सुचना करावी. असे का ठेवले असे न सांगता सुधारणा सुचवाव्यात अशी विरोधी पक्षनेता यांना विनंती आहे.

**अभिषेक सौदे** सभापती स्थायी समिती यांनी बजेट ठेवले आहे त्यांचे मी अभिनंदन करतो. हिंदु स्मशान भुमी, चैत्यनगर, वढी दर्गा कब्रस्थान, प्रभाग क्र 55 मध्ये कब्रस्थान,सांगवी स्मशान भुमी, लिंगायत धर्माच्या स्मशान भुमीचा विकास करण्यासाठी तरतूद ठेवण्यात यावी.महापुरुषाचे पुतळे च्या सुशोभिकरणासाठी तरतूद ठेवण्यात यावी. तसेच कै. सुधाकर डोईफोडे स्मारकासाठी तरतूद ठेवावा. लगंर साहेबचे बाबाजी यांनी शहरात खुप झाडे लावली आहे त्यासाठी हरीत शहर करण्यासाठी मदत केली आहे याकरीता झाडाना पाणी देणेच्या खर्चाची तरतूद ठेवण्यात यावी. बाबाजीच्या काम केले त्यांना आपण मदत दिलेली नाही.अिवकसीत वार्डाचा निधी ठेवला पाहीजे तो ठेवला नाही त्याची तरतुद करावी. कौठा, सांगवी, वसरणी, असर्जन भाग खडकपुराचा भाग यासाठी 50 लक्षाची तरतूद ठेवण्यात यावी. उत्तर नांदेडमध्ये मोठया प्रमाणात बांधकाम होत आहेत त्यासाठी या बांधकामाना परवानगी वेळेत देण्यात यावी जेणे करुन मनपाचे उत्पन्ना भर पडेल. सर्व मालमत्ता हे रेकॉर्ड वर घेण्यात यावे. हदद वाढ करण्यात यावी.बांधकामधारक आहेत ते वाडी इतर ठिकाणी बांधकाम करीत आहेत त्यासाठी हदद वाढ केली पाहीजे. गुंठेवारीला आपण बरेच वेळेला मान्यता दिलेली आहे. पण त्याची अमंलबजावणी होत नाही. ती करण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** आज एक एप्रील आहे त्यामुळे हे एप्रील फुल होवू नये असे मला वाटते. आयुक्त साहेबांनी रु.564 कोटीचा सुधारीत अर्थसंकल्प सादर केला. पान क्र.14 वर शैक्षणीक 379 संस्था आहेत. या शैक्षणिक संस्थाचा आपण टॅक्स घेतात काय हा टॅक्स घेतला जात नाही हा टॅक्स घेतला तर कमीत कमी 3 कोटी रुपयाचे उत्पन्न

मनपाला होणार आहे. आयुक्त साहेबांनी जे 566 कोटी रुपयाचे दिले आहे ही रक्कम कोठूण येणार आहे हे ही सागांवे. स्थायी समितीने बजेट मध्ये वाढ केली आहे आणि सर्वसाधारण सभा देखील वाढ करेल. हा पैश्या कोठून आणणार आहात. औरंगाबाद मनपामध्ये बजेटबाबत मुख्यलेखाधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. ज्या शिर्षकात रक्कम ठेवली आहे ती रक्कम आपण खर्च करणार काय हे सांगा. प्रशासनाचे सभापती महोदयानी दोन प्रस्ताव फेटाळून लावले आहेत. त्यांचे मी अभिनंदन करतो. 566 कोटी रुपये मनपात कोठूण येणार आहेत. पान क्र. 66 वर बाबा बलविंदरसिंघजी यांना देणेसाठी तदतूद ठेवली आहे. मागील दहा वर्षापासुन तरतूद ठेवण्यात येत आहे परंतू त्याची अमंलबजावणी काही होत नाही. बाबा बलविंदरसिंघ यांच्या टॅक्सचा विषय आहे तो विषय सभागृहात पास करुन दिला आहे त्याची अमंलबजावणी करण्यात आलेली नाही. तीन कोटीचे मागणी बिल बाबाजी यांना देण्यात आलेले आहे. याबाबतचे पत्र व्यवहार प्रशासनाने केला आहे काय याचा खुलासा करावा. गुरुव्दारा मुळे आपणास 2200 कोटी मिळाले आहे त्याचा टॅक्स माफ केला पाहीजे. शहर गुरुव्दारा मुळे जगात प्रसिध्द आहे. पान क्र 17 वर विमान सेवा सुरु करण्यासाठी काय पत्र व्यवहार केला आहे त्याचे पत्र क्रमांक देण्यात यावे. उर्दुभाषेची माहिती पुस्तीका तयार करण्यात यावे तसेच पंजावी भाषेत पुस्तीका तयार करण्यात यावे कारण या शहरात जास्त प्रमाणात येतात. आग प्रतिबंधक 2006 च्या अॅक्ट नुसार मागणी करण्याची तरतूर आहे. हा निधी शासनाकडून मिळत आहे. या शिर्षकाखाली मोठया प्रमाणात निधी पडून आहे तो खर्च का करण्यात येत नाही. तत्कालीन आयुक्तांनी दोन टेन्डर काढले होते परंतू ते टेन्डर कोणीही काढले नाही. आग प्रतिबंधक नांवाने हा निधी स्वतंत्र ठेवला तर टेन्डर कंत्राटदाराने घेतले असते. एक परीपत्रक दि. 31 ऑगस्ट 2009 चे आहे त्यानुसार ड वर्ग मनपाला देता येते. त्यामूळे जुन्या नांदेडला एक अग्निशमन केंद्र देण्यात यावे. मनपाची जागा केळी मार्केटला आहे त्या जागेवर हे केंद्र उभारण्यात यावे. अग्निशमन विभागात एक नविन वाहन अवदुत नांवाची गाडी आलेली आहे ती गाडी ठेवण्यात यावी. मुळ मुदयावर येतो टॅक्स संदर्भात उप आयुक्त साहेब आपले मालमत्ता कराचे एकुण मागणी थकबाकीसहीत 151 कोटीची आहे. ती मालमत्ता 150 कोटीची आहे जर या कराची वसुली योग्य रीतीने केली तर आपणास कर्ज घेण्याची गरज नाही. 120 कोटी रुपयाचे कर्ज घेतले तर त्याचा हप्ता आपणास दर महा 60 लक्ष रुपये भरावा लागत आहे. आणि आपण 150 कोटीचे कर्ज घेतले तर आपण ही रक्कम कोणत्या रक्कमेतून भरणार आहोत. आपली कुवत आहे काय हे सांगा. न्यायालयीन प्रकरणे आपली सहाडेसहा कोटीचे आहे. आपले जे लॉयर आहेत ते कशाचे काम करीत आहेत. शासकिय कार्यालयाकडे आपले 8 कोटी येणे आहेत त्याची वसुली करण्यात यावी. इतर ठिकाणी आपण सिल मारतो या कार्यालयाला आपण का सील मारत नाही हे सांगावे. तीन दिवस बिल भरले नाही तर त्यांनी आपले लाईट बंद केली आहे. एकशे एकावन्न कोटी रुपयाची आपली मागणी आहे. सामान्य जनतेला आपण वेठीस धरतो. या कार्यालयावर काय कार्यवाही करणार हे देखील स्पष्ट करावे. बांधकाम परवागनीचे एकुण 6 टेबल आहेत आपली परवानगी बाबतची प्रकरणे किमान 250 प्रकरणे आहेत ती का निकाली काढण्यात येत नाही. 2010 चे परीपत्रक आहे त्यामध्ये साधी परवानगी देण्यात यावी. परंतू आपण आपलेकडील सहा टेबलमुळे आपणास बराच त्रास होत आहे. टेक्नीकल्स लोकांनाच त्या ठिकाणी देण्यात यावे. काही नागरीक हे एका माळयाची परवानगी घेतात पण प्रत्याक्षात दोन माळयाचे बांधकाम करतात. त्यावर आळा बसला पाहीजे यातून मनपाचे उत्प वाढ होर्इल. 2017 चे परीपत्रक आहे की पुर्ण इमारतीला अनाधिकृत शास्ती लावण्याची तरतूद नाही. तरीही आपण पुर्ण इमारतीला अनाधिकृत शास्ती लावत आहे यात सुधारणा करावी. तसेच शासनाचे असेही एक परीपत्रक आहे की, जे बिल्डर मोठी इमारतीचे बांधकाम करुन प्लटची विक्री करतात सर्व नागरीका ती इमारत विक्री करुन निघून जातात. त्यावर सुध्दा आळा बसला पाहीजे. परिपत्रकानुसार बांधकाम परवानगी घेतली आहे. ते वगळुन शास्ती लावावयाची की पुर्ण इमारतीला शास्ती आकारावयाचे याबाबतचे मार्गदर्शन शासनाकडून मागविण्यात यावे जेणे करुन नागरीकांना याचा त्रास होणार नाही.कलम 142 नुसार जे वाळूचे ट्रक जातात त्यांना आपण टॅक्स लावावा. रजीष्ट्रीचे पैसे आपणास एक टक्का मीळतात त्याएैवजी ते 3 टक्के करण्यात यावे. आरटीओ कार्यालयाकडून जे परवाना दिला जातो त्याचीही मागणी करण्यात यावी कारण रस्ते आपण तयार करतो. ते रॉयल्टी घेता येते त्यांच्या कडून पॅसे आले पाहीजे. नगरसेवकस्वेच्छा निधीची रक्कम वेगळी ठेवण्यात यावी.किमान एका नगरसेवकासाठी 25 रुपये ठेवण्यात यावे अशी माझी मागणी आहे. या 25 लक्षाची कामे आताच काढण्यात यावे. नगरसेवकांकडून सुचना मागण्यात याव्यात कोणती कामे त्यांच्या प्रभागात करावयाचे आहे त्यानुसार कामे करावे.

**सौ. ललिता शिंदे** 2016-2017 चा सुधारीत अर्थसंकल्प सादर केला आहे. विवीध संघटना , नागरीक, अर्थतज्ञ, नगरसेवक यांना घेवून हा अर्थ संकल्प तयार केला आहे. म्हणुन स्थायी समिती सभापती सौ.मंगला देशमुख, व स्थायी समितीचे सर्व सदस्य यांना अतिशय स्तुत्य असा अर्थ संकल्प तयार केला त्याबाबत त्यांचे स्वागत आहे, अभिनंदन आहे.आयुक्तांनी जो अर्थसंकल्प सादर केला आहे त्यात महीला बाल कल्याण समितीला पुर्ण

अर्थसंकल्पाच्या 10 टक्के भाग हा ठेवावा लागतो. 10 टक्के रक्कम ठेवलेली आहे ती रक्कम महिला बाल कल्या समीतीने खर्च करावयाची आहे. एक कोटी 30 लक्षाचा निधी आमच्या वाटयाला येतो. महीलाच्या बाबत निधी का खर्च करण्यात येत नाही. का प्रशासन उदासिन आहे हे सांगावे. हा निधी खर्च होणे आवश्यक आहे. सिडको भागाच्या नागरीकांना कला गुणाना वाव देण्यासाठी एक नाटय गृहाचे बांधकाम करण्यात यावे.

**स. शेर अली** मला आरोप करावयाचे नाही. मला केवळ सुचना करावयाच्या आहेत. त्यामुळे पान क्र 5 वर नविन मालमता कराची आकारणी करीत असतांना कोणतेही शुल्क आकारणी केली जात नाही. त्यानुसार आरआरच्या दरानुसार इतर मनपा शुल्क आकारले जात असतात त्याप्रमाणे आपल्या मनपात एक टक्का सुट देण्यात येत आहे. मला वाटते की, एक टक्का आकारण्या ऐवजी हा दर 0.5 टक्के दर हा झोपडीपटी धारकांना आकारण्यात यावा. पान क्र 2 वर आयुक्त साहेबांनी 150 कोटी रुपयाचे कर्ज घेण्याबाबतचा विषय आहे. त्यात जेएनएनएयुआरएम,नगरोत्थान, बिएसयुपी इत्यादी योजनाची कामे कोणती आहेत हे कळत नाही. हे मोघम का ठेवण्यात आले आहे. पान क्र 19 वर अग्निशमनच्या इमारतीचा विषय आहे. त्यानुसार एक अग्निशमनचे केंद्र जुने नांदेडसाठी स्थापन करावे. एवढे दिवस जागा मिळत नसल्याने हे केंद्र स्थापन करता आले नाही आता केळी मार्केटची जागा उपलब्ध झाली असल्याने त्याठिकाणी अग्निशमन केंद्र उघडण्यात येईल अशी अपेक्षा व्यक्त करतो. पेज क्रमांक 22 वर मुख्य रस्त्यावर विदयुत खांब उभारण्यासाठी निधी ठेवण्यात आलेला आहे. तो निधी खर्च करण्यात यावा तसेच पान क्र 29 वर शाळेसाठी वर्ग खोल्या बांधण्यासाठी निधी ठेवला आहे. परंतू हैदरबाग येथे एक हायस्कुलचा प्रस्ताव शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्यासाठी वर्ग खोल्याची आवश्यकता आहे. त्यासाठी तरतूद ठेवण्यात यावी. त्यातून शाळेच्या इमारतीचे बांधकाम करावे. अल्पसंख्याक निधीसाठी पान क्र 44 वर तरतूद ठेवण्यात आली आहे. दोन तीन वर्षा अल्पसंख्याक बहुल विकासासाठी हा निधी येतो तो निधी परत जात आहे तो परत गेला नाही पाहिजे अशी आमची मागणी आहे. पान क्र. 51 वरील स्मशान भुमी ऐवजी कब्रस्थान अशी दुरुस्ती करण्यात यावी. जुन्या नांदेड शहराला एक 35 एमएलडीचा डब्ल्यूटीपी प्लॉन्ट बांधण्यासाठी तरतूद ठेवण्यात यावी.

**डॉ.शिला कदम** वाडीया, बोरबन फॅक्टरी या एरीयामधील बांधकामाबाबत बरेच पेपर मध्ये आलेले आहे. चर्चा सुध्दा झाली आहे. या एरीयामधील सर्व इमारतील नियमित केल्यास किमान मनपाला 100 कोटी रुपयाचा निधी गोळा होवू शकते हा एरीया रेग्यूलर करण्यासाठी मी पुढाकार घेण्यास तयार आहे. एक समिती नेमनण्यात यावी. बरेच डॉक्टर लोक आयुक्तांना येवून भेटले आहेत. आपण हार्डशिप प्रिमीयरमध्ये रेग्यूलर करुन घ्यावे असे मला वाटते. आम्ही महिला बाल कल्याण समितीचे बजेट सादर केले आहे परंतू संचिका सादर केल्यानंतर त्यास मान्यता मिळत नसल्याचे दिसुन येत आहे. केवळ चार महीण्याचा कालावधी शिल्लक राहीला आहे. तीन तीन महीणे संचिका फिरवू नये. आमच्या संचिकांना त्वरीत मान्यता दयावी.

**डॉ.करुणा जमदाडे** सालसन 2017-2018 चे बजेट सौ.मंगलाताई देशमुख सभापती स्थायी समिती यांनी सादर केले मी त्यांचे अभिनंदन करते. आयुक्तांनी देखील शहराच्या विकासासाठी बजेट सादर केले आहे. त्यांचे स्वागत करते. काही काही ठिकाणी जनतेच्या हीताचे विषय नव्हते ते विषय सभापती यांनी फेटाळून देखील लावले आहे त्याबाबत त्यांचे अभिनंदन करते. सभापती व आयुक्त यांनी मांडलेले बजेटमध्ये खुपच तफावत आहे. डॉक्टर लेन मधील काही डॉक्टर ओपीडी करतात व काही डॉक्टर हे आयपीडी करतात. त्याबाबत त्यांचे त्यांना परवाना दयावा किंवा देवू नये असा विषय होता. बॉम्बे अक्ट प्रमाणे जावे कि काय करावे माझी विनंती आहे डॉक्टर लोकांची एक मिटींग लावावी यातुन मोठया प्रमाणात आपल्याला आर्थिक फायदा होणार आहे. तसेच लघू उदयोग वाले लोक खुप आहेत त्यांना सुध्दा परवाना देण्यात आलेला नाही त्यानाही परवाना देण्यात यावा यातुनही आपले उत्पनात वाढ होईल. साडया विकणे, कोचीन क्लास, ब्युटी पार्लर, मसाला उदयोग असेल असे अनेक उदयोग चालू असतात त्यांना व्यवसाय परवाना देण्यात यावा. कोचीन क्लासचे सर्व्हे केला तर आपणास मोठया प्रमाणात महसुल मिळू शकेल. बांधकाम परवाने आपल्याकडून वेळवर दिले जात नाहीत. का दिले जात नाही. हेही पहाणे गरजेचे आहे. सर्व सामान्य लोकांना मागे सहा महीने परवाना दिला गेला नव्हता. आठ दिवसाचा कालवधी दिला तर आपले उत्पन वाढू शकते. सिडको एरीयासाठी खुप कमी बजेट ठेवले आहे ते शहराचे सभापती असल्याने त्यांची भावना योग्य आहे. पण माझा प्रभाग हा अविकसीत आहे व दुर्लक्षीत ही आहे. मागील चार वर्षापासुन मी पाठपुरावा करीत आहे पण काही गोष्टी मिळाल्या नाहीत. बजेट सादर होत असते. पण यावर्षी माझ्या प्रभागासाठी काहीही तरतूद ठेवली गेलेली नाही. मलाही नागरीक प्रश्न विचारणार आहेत. नागरीकांना प्रश्नाचे उत्तर देणे साठी किमान माझ्या वार्डासाठी दोन कोटीची तरतूद ठेवण्यात यावी अशी विनंती करते. केंद्रीय धर्तीवर मनपाचा शाळा असावी असा प्रस्ताव आयुक्तांनी सुचविला आहे माझा प्रभाग हा दुर्लक्षीत असल्याने त्यासाठी ती शाळा माझ्या प्रभागात चालू करण्यात यावी. जमीने भुसंपादन व इमारतीचे बांधकाम करण्याची तयारी दर्शविली आहे. मागच्या तीन वर्षा पासुन अंगणवाडीचा प्रस्ताव अमलात आलेला नाही. इंग्रजीची शाळा यावी अशी विनंती करते. मुर्ती आणि पुतळे यासाठी चार

कोटीचे बजेट याठिकाणी ठेवले आहे. मागच्या चार वर्षापासुन आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करण्याचा विषय आहे त्याची अदयाप पुर्तता झालेली नाही त्याचे काय झाले हे कळाले नाही. कामास सुरुवातही झालेली नाही. दरवर्षी बजेट मध्ये तरतूद ठेवण्यात येते पण काम होत नाही. येत्या 14 एप्रीलला आंबेडकर चौकाचे सुशोभिकरणाच्या कामास सुरुवात करावी. सिडको एरीया मध्ये उस्मान नगर रोडवर रमाई चौक आहे त्या चौकाचे सुशोभिकरण करुन त्या ठिकाणी रमाईचा पुतळा बसविण्यात यावा अशी मी समाजाचे वतीने मागणी करते. बजेटमध्ये ठेवून उपयोग नाही तर कृतीत बजेट आले पाहीजे अशी अपेक्षा व्यक्त करते आणि थांबते.

**अशोक उमरेकर** सालसन 2017-18 चा अर्थसंकल्प सहाशे कोटी 66 लक्ष 52 हजार रुपयाचा सादर केला आहे.

**आनंद चव्हाण** पल्लवी, मोरेश्वर, पंदे यांना का माफी दयावी. आपले पैसे नाहीत का? मोबाईल टॉवर आपण सील का करु शकत नाही. न्यायालयाने सांगीतले म्हणून कार्यवाही करत नाही. एमएससीबी वाले हे काही सेवा करीत नाही. त्यांना ही टॅक्स आकारण्यात यावा. माझ्या वार्डात वर्कशॉप पासुन पावसाचे पाणी जमा होते. हे पाणी आल्यामुळे माझ्यावार्डात थांबते त्यावर उपाय योजना करावी ही विनंती.

**अशोक उमरेकर** माझ्या प्रभागासाठी एकही पैश्याची तरतुद करण्यात आली नाही.श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या नांवाची कमीान उभी करण्यात यावी अशी ठराव पास झाला आहे. त्याची तरतूद करावी.

**सभागृहनेता** हा अर्थसंल्कप सादर केला आहे. मी विशेष आभार सत्तार साहेबाचे मानतो त्यांचा 24 वा अर्थसंल्कप आहे. शेर अली, गील साहेब यांचे ही आभार व्यक्त करतो. असे जेष्ठ नगरसेवक या सभागृहात आहेत. त्यांनी चांगली सुचना मांडली आहे. जनतेवर शुल्क वाढ होणार होती ती वाढ सर्व स्थायी समितीच्या सदस्यांनी फेटाळून लावली आहे. आरआर मुळे दुप्पट टॅक्स लागला होता. चौपट वाढ झाली असती. अनाधिकृत बांधकामवर शास्ती यातच समावेश आहे. त्यामुळे मागणी बिलात वाढ झालेली आहे. ज्याच्या करावर ही मनपा चालवतो त्यांचाही कोठे तरी विचार झाला पाहीजे. आपण ज्या सुचना मांडल्या आहेत. त्या टप्पा टप्पाने अंमल करु. आपण पुढे जात असतांना मागचा देखील आढावा घेतला पाहीजे. मागे वसुलीची जी मरगळ होती ती मरगळ आता कमी केली आहे. वसुली अत्यंत चांगली झाली आहे. त्यामुळे आयुक्त, उपआयुक्त व सर्व सदस्य यांचे आभार व्यक्त करतो. अमृत योजनेत पाणी पुरवठा व ड्रेनेज कामे पुर्ण करुन घ्यावे काही कामात आपण पुढाकार घेतला पाहीजे काही कामे पैश्यानेच करण्याची आवश्यकता नाही. संचखड गुरुव्दारा साठी पाण्याची लाईन खोडवेकर साहेबांनी टाकली त्यांचेही या ठिकाणी मी अभिनंदन करतो. लगंरसाहीब गुरुव्दारासाठी पाण्याची लाईन टाकली यासाठी आयुक्तांचे मी विशेष आभार व्यक्त करतो. आठ दिवसाचे आतं काम सुरु केले आहे. लंगरसाहीब गुरुव्दारा यांनी यात्रेकरुसाठी इमारतीचे बांधकाम करीत होते त्यांना विकास शुल्काचे एक कोटी 35 लाख रुपये एवढा लागत होता. ती रक्कम बरीच प्रमाणात कमी करता आली आहे. मालमत्ता कराची वसुली आपली 55 कोटी रुपये झाली आहे. आपली थकबाकीसहीत चालू वसुली एकुण 155 कोटी रुपयाची वसुली करावयाची आहे. तुलनेने यावर्षी झालेली वसूली कमीच आहे. शासनाने 150 कोटीचे कर्ज मंजूर केले आहे. या कर्जाची भर मनपाच्या हददीत राहणा-या नागरीकांवर पडणार आहे. शहरातील नागरीकांच्या ही काही अपेक्षा आहेत. मालमता कराची वसुली होत असतांना विकास शुल्काचा आकडा हा 50 टक्के ने कमी झाला आहे. नागरीकांना बांधकाम परवानगी पाहिजे आहे. त्यांनाही दिलासा मिळणार आहे आणि आपले ही यातून उत्पन मिळणार आहे. आता आपल्याला प्रिमीयम आकारता येत नाही. आता शासनाने 1.3 चा एफएसआय आपणास मंजूर केला आहे. जे बिल्डर पैसा लावून पैसा कमवित आहेत त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहीजे. मनपाला आता दुसरे उत्पन्नाचे स्त्रोत उरलेले नाही. एलबीटी बंद झाली आहे. जीएसटी आता लागु होणार आहे. कर तरी नागरीकांना आपण किती लावणार आहोत.बांधकाम परवानी एका महीण्यात 10 ते 20 परवानगी देत असतात. परवानगी तफासण्याची जबाबदारी ही संबधीतावर टाकण्यात यावी. बांधकाम परवानगीचे फोटा काढण्यात यावे. शासनाचे पुर्ण नियमाचे पालन करता येणार नाही परंतू किमान 1.3 एफएसआय तरी आपण पाहु शकतो. चौकशी झाली पाहीजे. शहरात सध्या कच-याचा प्रश्न निर्माण झाला आहे आपण निविदा देखील काढली आहे. शहराचा कचरा गोळा करण्यासाठी 10 ते 20 कंपन्या तयार कराव्यात. त्यांनी वसाहतीची निवड करुन काम करावे. एकच कंपनी राहील्यामुळे कचरा उचलण्याचे काम होत नाही. 500 घराची सफाई करुन देण्याची जबाबदारी मी घेतो. असे सर्वानी 500 घरे घेवून सफाई करावी असे मला वाटते. ज्या मालमता धारकाकडे पाण्याची जोडणी नाही तरी त्याला 10 हजार टॅक्स लागला आहे. अशा प्रकरणात त्वरीत निर्णय घ्यावा.बांधकाम परवानगीचे पेपर हे सर्व ऑनलाईन स्वीकारतो. परंतू त्यामुळे बांधकाम परवानगी देण्यास बराच विलंब हात आहे. ऑनलाईनमुळे बांधकाम परवानगी ही त्वरीत मिळावी अशी अपेक्षा होती परंतू तसे होतांना दिसत नाही.

**अब्दुल सत्तार** एक काळ होता की मनपातील गल्लीतील रस्त्यावर हॉट मिक्स करुन घेतले जात होते. मोठे रस्ते न घेता त्यांच्या प्रभागातील रस्ते करावे असे बजेटमध्ये नमुद केले आहे. आमचा विरोध नाही याबाबीसाठी एक सभा उदया लावा. व या 16 सदस्यांचा सत्कार करा.त्यांचे आम्ही अभिनंदन करतो. नगरसेवक अभ्यासपुर्ण सुचना

करतात परंतू प्रशासन त्याची अंमलबजावणी करीत नाही हे माझे 25 वे बजेट आहे. सभागृह नेत्याने अंत्यत चांगली सुचना मांडली. 2 वर्षापासुन कॉम्पलेक्सचे काम रखडलेले आहे याकडे लक्ष दिले पाहीजे. आपण टॅक्स वसुल करतो आरआर नुसार टॅक्स कॉन्सीलने मंजूर करुन दिला यामुळे 150 कोटी रुपये वाढ करुन दिली आहे. मनपाची मालमत्ता ही तशीच पडून आहे त्याचा विचार केला तात नाही. काबरानगर,बंजारा होस्टेल येथील सगळे कॉम्पलेक्स बंद पडले आहे. मोहमद अली रोडवरील बांधकामे यावर अमंलबजावणी केली नाही. नव्या मोंढयातील प्लॉटसुध्दा तसाच पडून आहे. मनपाने 150 कोटीचे कर्ज घेणार आहोत. त्याचा उपयोग हा योग्य पध्दतीने झाला पाहीजे. शहरातील मोठया रस्त्याचे कामे 25 ते 30 कोटीची काढण्यात यावीत. 10 लाखाच्या कामत अंतर्गत रस्ते हस्तांतरीत करुन घेण्याची काय घाई होती. हा विषय विषयपत्रीकेवर घेवून शासनाकडे या रस्त्याच्या मेटन्ससाठी पैशाची मागणी करावी. मेटन्ससाठी पैसा नसल्याने हा आपणास आर्थिक भुर्दंड होईल. त्या रस्त्याची दुरुस्ती करुन घेवून त्याचा आपल्याकडे समावेश करुन घेण्यात यावा. हा विषय सभागृहाच्या समोर आणुन मंजू करण्यात यावा. स्वच्छ अभियांनाचे पैसे आपणास मिळत आहेत त्याचा योगय उपयोग झाला पाहीजे. कच-याचे टेन्डर चार वेळा काढण्यात आले ते भरण्यासाठी कोणी येत नाही त्यात काय त्रुटी आहेत त्या सुधाराव्या मागील 50 वर्षापासुन कचरा टाकण्यात येत होता. तो कचरा टाकणे बंद केला त्यामुळे मी मागील आयुक्तांचे आभार मानतो. त्या ठिकाणी सुंदर उदयान तयार करावे अशी आमची विनंती आहे. हैदरबागचा दवाखाना त्वरीत चालू करावा अशी आमची विनंती आहे.

**तुलजेस यादव** माझ्या भागातील पाण्याची लाईन ही 70 वर्षापुर्वीची आहे. ज्यावेळी पाणी सुटते त्यावेळी फुटलेल्या पाईपातुन लाखो लिटर पाणी वाया जाते ती लाईन बदलण्यासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात यावी. जुन्या नांदेड शहरासाठी एक डब्ल्यूटीपी प्लॉन्टची तरतूद करण्यात यावी. मन्याड गल्ली,सराफा या ठिकाणचे रस्ते करण्यासाठी तरतुद करण्यात यावी.

**गफार खॉन** चौदाव्या वित्त आयोगाचा निधी आलेला आहे यातुन वॉटर फिल्टर प्लांट व इएसआर चे काम करण्यात यावे हे काम केले तर पाणी टंचाई दुर करता येईल.

**महापौर** दिनांक २७.०२.२०१७ रोजीच्या मागील सभेत सुध्दा घनकचरा व्यवस्थापनाचे कंत्राटदार ए.टु.झेड. इन्फ्रास्ट्रक्चर हरियाना यांना शहरातील कचरा उचलुन डंपिंग ग्राऊडवर टाकण्याचे काम मागील अनेक वर्षा पासुन देण्यात आले होते सदरील एजन्सीचे काम समाधानकारक नसल्याचे अनेक वेळा सभागृहात स सदस्यांनी प्रश्न मांडण्यात आला होता सदरील एजन्सीची मुदत संपत असल्यामुळे नव्या कत्राटदाराची नियुक्ती तात्काळ करण्यासाठी निर्देश देण्यात आले होते अद्याप पर्यंत प्रशासनाने कोणत्याही कंत्राटदाराची नियुक्ती केलेली नाही त्यामुळे शहरात जागेजागे कच-याचे ढिगार पडत आहे. त्यामुळे प्रशासनाने अद्याप पर्यंत न्वया कंत्राटदाराची नियुक्ती केलेली नाही ही बाब अतिशय गंभीर आहे त्यामुळे नागरीकांना कच-यामुळे त्रास होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. नविन कंत्राटदाराची नियुक्ती न केल्यास व ए.टु.झेड चे कंत्राटदार पडून गेल्यावर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.

**महापौर** ज्या नगरसेवकांनी बजेट संदर्भात सुचना मांडल्या आहेत त्या सर्व संचनांची बजेटमध्ये तरतुद करण्यात येईल. अबचलनगर, पिरबु-हाणनगर या भागातील लाईन बदलण्यासाठी लागणार निधी आहे त्या निधीची तरतुद करण्यात येईल. काही शैक्षणिक संस्थाना कर लावण्यात येत नाही काही संस्थाना कर लावण्यात येतो तो कर त्यांना लावण्यात येणार नाही. याबाबतचे कोर्टाचे काय निर्णय आहे तो निर्णय तपासण्यात यावा. महीला बाल कल्याण समितीचे बजेटमधील रक्कम या आर्थीक वर्षात खर्च करण्यात येईल अनाधिकृत बांधकामाना शास्ती लावण्यात येत आहे. ती नियमानुसार कमी करण्यात येईल. बांधकाम परवानगी ही तात्काळ देण्यात यावी. शहरात मोठया प्रमाणात मालमत्ता आहेत तर त्या मालमतेचा सर्व्हे बाहेरच्या एजन्सी कडून करुन घेण्यात यावा. वार्ड विकास निधीचे कामे सदस्यांनी सांगीतले आहेत. ती कामे त्वारी हाती घेण्यात यावी. शहरातील लोकांनाचा पैसा आहे त्या पैशामधुन लोकांना सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात. प्रत्येक नगरसेवकांना 30 लक्ष व प्रभागाला 60 लक्ष वार्ड विकास निधी देण्यात यावा. या कामाच्या त्वरीत निविदा काढाव्यात याची घोषना आयुक्त करतील. सध्या शहरात उष्णतेची लाट आलेली आहे ही लाठेसाठी जनतेमध्ये जनजागृती करण्याकरीता शहरातील मुख्य रस्त्यावर होर्डींग लावावे. तसेच शैक्षणिक संस्थांना या मोहिमेमध्ये सामील करुन घ्यावे. ग्लोबल वार्नींग म्हणुन महिण्यातून एक दिवस नो व्हीकल डे म्हणुन पाळण्यात यावा. शैक्षणिक संस्थाना सुध्दा आवाहन करण्यात यावे. सर्वानी एका दिवशी आपले वाहन वापरु नये. मनपा हददीतील बस चालतात. त्या बस मध्ये महीलांसाठी बसमधील 50 टक्के आसन हे आरक्षीत करावे. मनपा शाळेतील मुलांना सोयी सुविधा मिळवण्यासाठी एक कोटीची तरतूद केलेली आहे. शहरातील नागरीकांना जनेरीक औषधी उपलब्ध करुन देण्यासाठी 50 लक्षाची तरतूद ठेवण्यात आली आहे. जया सदस्यांनी सुचना केल्या आहेत त्या सुचनाचा समावेशकरुन हा अर्थ संकल्प तयार करण्यात करण्यात

येणार आहे. टॅक्सपासुन गोळा झालेली रक्कम व बीएसयुपीच्या लाभार्थ्यांचा हीस्या आपण गोळा करुन ती रक्कम शहरातील विकासचे कामे करण्यासाठी वापरण्यात येईल. आकृतीबंधाचा विषयीचा निर्णय घेवून तो शासनाकडे पाठविण्यात येईल.

**आयुक्त** मागील पाच तासांपासुन बजेटची मिटींग चालू आहे. बजेटची मिटींग ही एवढा वेळ चालणे म्हणजे सदस्यांनी अत्यंत अभ्यास पुर्वक बजेटमध्ये सुचना केलेल्या आहेत ज्या सुचना उत्पन्न वाढीच्या आहेत तसेच प्रशासकिय सुधारणा करण्याच्या आहेत. सदस्यांनी ज्या सुचना केल्या आहेत त्या 100 टक्के घेतल्या जाणार आहेत. जी कामे पुर्ण करावयाची आहेत ती निश्चीतपणे पुर्ण करण्यात येतील. एका प्रभागामध्ये 30 लक्ष रुपयाचे कामे करण्यात येतील हे निश्चीत आहे.

**उप महापौर** जवळपास पाच तासांपासुन अर्थसंकल्पाच्या संदर्भात आपली बैठक चालू आहे मला अत्यंत आंनद आहे की एकढा अभ्यास पुर्ण अर्थ संकल्प सदस्यांनी सुचना केलेल्या आहेत मागील पाच वर्षापासुनमी पहात आहे की, प्रत्येक नगरसेवक हा अत्यंत चांगली मांडणी करीत असतांना दिसत आहे परंतू प्रशासनाने त्यावर ध्यान देतांना दिसत नाही. प्रशासनाने संदस्याचा सुचानाचा विचार केला पाहीजे. हे लोकशाहीचा शक्ती आहे लोकप्रतिनिधी सुचना करतात आणि त्यावर प्रशासन हे अमल करीत नसतील तर त्यावेळी लोकशाहीला घातक आहे. गील महाराज दर वर्षी चीनी मातीची लाईनचा विषय मांडतात परंतू त्यावर अमंलबजावणी होत नाही हे खेदाची बाब आहे यासाठी आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता आहे. सुचना केल्यानंतरही प्रशासन का अंमल करत नाही. आम्ही निवडून आलेलो आहोत. यावरुन हे सिध्द होते की प्रशासन हे पॉवर फुल आहे हेच सिध्द होते. आपले काहीच चालत नाही. यामुळे प्रशासनावर आपले नियंत्रण असणे आवश्यक आहे. लोकप्रतीनिधी हे लोकामध्ये राहतात. त्यांच्या काय अडचणी आहेत याचा उल्लेख या ठिकाणी करीत असतात. प्रशासन काम करत नाही तर त्याला आपण जबाबदार आहेत.

**सभागृहनेता** मा. महापौरांना अंदाजपत्राकातील कोण कोणत्या हेड मध्ये वाढ व कमी करुन अंतीम करण्याचे अधिकार देण्यात येते त्यानुसार ठराव पारीत करण्यास मान्यता देण्यात येते.

**अ. सत्तार** सभागृहनेता यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** सालसन 17-18 चे मुळ अर्थसंकल्पाच्या जमा बाजुस शासनाचे विशेष अनुदान म्हणुन 28,15,000/-, सालसन 16-17 चे मुळ अर्थसंकल्प खर्च बाजु मध्ये ग्लोबल वार्मीगविषयी जागृती करणेकरीता विविध उपक्रमांसाठी तरतूद (जसे ना-वाहन दिवस, जनजागृतीवर होर्डीग्ज, डिजीटल बोर्डस इत्यादि) . 50,00 लक्ष, महिलांना रात्रीचे वेळी घरी पोचविण्यासाठी बसस्थानक व रेल्वेस्टेशन येथे महापालिकेतर्फे वाहन व कर्मचारी यांची व्यवस्था करणे रु. 50.00 लक्ष, महिलांना अटो प्रशिक्षण व अटो खरेदी करणेसाठी तरतूद . 50.00 लक्ष, माहे मे महिन्यात नांदेड शहरात रेन वॉटर हॉर्वेस्टींग योजना राबविणे रु. 01.00 कोटी, शहरामध्ये विविध भागात वृक्षारोपण करणे . 01.00 कोटी, महानगर पालिकांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या दृष्टीने अद्यावत सुविधा पुरवीणेसाठी व स्पर्धात्मक परिक्षेसाठी तरतूद . 50.00 लक्ष, शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महानगर पालिकेच्या विविध हॉस्पीटल्समध्ये अद्यावत सुविधा पुरविणे व जेनरीक औषधे उपलब्ध करुन देणेसाठी तरतूद . 50.00 लक्ष, हैदरबाग येथील दवाखाण्यामध्ये साहित्य खरेदी करणे . 01.00 कोटी, सिडको भागात नाटयगृह उभारणे रु. 50.00 लक्ष, वाडीया/ घामोडीया/ बोरबन इत्यादि भागात धर्मशाळा बांधणे . 50.00 लक्ष, आठवडी बाजारातील भाजीपाला कच-यावर प्रक्रीया (सिडको, गोकुळनगर, इतवारा) प्रकल्प उभारणे . 20.00 कोटी, डंकीन येथे वॉटर पार्क उभारणे रु. 50.00 लक्ष, मनपाच्या पाण्याच्या टाक्यांवर P.P.P. तत्वावर R.O. मशिन्स बसवून शुध्द पाण्याचा पुरवठा करणे 01.00 कोटी, शहरातील 10 खुल्या जागांवर क्रिडांगण विकसित करणे . 50.00 लक्ष, (1) राष्ट्रपुरुषांची पुतळे देखभाल, सावित्रीबाई फुले – महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहु महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रतापसिंह व हरीत क्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांचे पुतळे उभारणे, तसेच तथागत भगवान गौतम बुध्दांची पुर्णाकृती मुर्ती बसविणे व इतर पुतळे उभारणे. **(महाराष्ट्र शासनाच्या निधीतुन तरतुद न झाल्यास मनपा निधीतून)** (रु.3 कोटी) (2) महात्मा बसवेश्वर यांचा अश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभीकरण करणे (रु.2 कोटी), लिंगायत स्मशानभुमी विकसीत करणे रु. 50.00 लक्ष, शिक्षण, महिला व बालकल्याण समितीकरीता खालील तरतुद करणे. महिला बचत गट मेळावा, शॉपिंग महोत्सव (रु.2 लक्ष), कै. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमीत्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार (रु.2 लक्ष), कपाट व बेंचेस (रु.25 लक्ष), शिलाई मशिन (रु.15 लक्ष), आरोग्य विषयक परिसंवाद (रु.1 लक्ष), ज्येष्ठ नागरीकांचा महिला आरोग्य शिबीर (रु.15 लक्ष), बालदिन/ बालमेळावा/ बालचित्रपट महोत्सव (रु.5 लक्ष), जागतिक महिला दिन (रु.3 लक्ष), जनजागृती व लोकशिक्षण (रु.5 लक्ष), जलतरण प्रशिक्षण महिलांसाठी (रु.2 लक्ष), इतर महिला सबलीकरणाच्या विविध योजना (रु.10 लक्ष) असे एकूण 85.00 लक्ष, प्रभाग क्रं.21 अक्सिस बँक ते एनटीसी मिलपर्यंत सीसी रस्ता तयार करणे . 55.00 लक्ष, प्रभाग क्रं.21 डॉ. सुनिल कदम ते रेल्वे स्टेशन पर्यंत सीसी रस्ता करणे रु. 25.00 लक्ष, प्रभाग क्रं.21

बिकानेर स्वीट ते रेल्वे स्टेशनपर्यंत (डॉक्टरलेन मधील) सीसी रस्ता तयार करणे . 25.00 लक्ष, प्रभाग क्रं. 36 मध्ये रहीमपुर, शंकरनगर, भाग्योदयनगर, न्यायनगर भागात रस्ते, नाली व मलनि: स्सारण वाहिनी व ईतर मुलभूत सुविधा उपलब्ध करणेसाठी रु. 50.00 लक्ष, प्रभाग क्रं.29 मध्ये चौफाळा भागात पोलिस चौकीच्या पाठीमागे मनपाच्या मोकळया जागेत व्यापारी संकुल व व्यायामशाळा बांधणे . 30.00 लक्ष, प्रभाग क्रं. 16 मध्ये विविध मुलभूत विकासाची कामे करणे. (रु. 80.०० लक्ष), चुनाल नाल्यावर समिराबागला जाणा-या रोडवर बॉक्स टाईप कल्व्हेट तयार करणे . 75.00 लक्ष, पंचशिलनगर मध्ये चुनाल नाल्यावर बॉक्स टाईप कल्व्हेट तयार करणे रु. 45.00 लक्ष, तहुराबाग मध्ये रोड व नाली तयार करणे . 25.00 लक्ष, बरकतपुरा भागामध्ये रोड व नाली तयार करणे . 25.00 लक्ष, समिराबाग मध्ये रोड व नाली तयार करणे रु. 30.00 लक्ष, खडकपुरा भागामध्ये मुख्य रस्ता करणे . 20.00 लक्ष, शहरातील विविध भागातील स्मशानभुमी, विकास व भुसंपादन अंतर्गत राजस्थानी समाजासाठी 10000 स्क्वे.फुट जागा व त्याच्या विकासासाठी व संरक्षण भिंत बांधणेसाठी रु. 01.00 कोटी, अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळयासाठी . 50.00 लक्ष, मगनपुरा ओपन स्पेस मनपा जागेत इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणे व इमारत बांधकामासाठी . 50.00 लक्ष, सखल भागात पावसाच्या पाण्याचा निचरा अंतर्गत वसंतनगर भागामध्ये नाला रुंदीकरण व स्लॅब करणे . 50.00 लक्ष, महानगरपालिका गणेशोत्सव, भंडारा व दिपावलीचे पानसुपारी करीता . 05.00 लक्ष, नवा मोंढा मैदानात हायमास्ट टाकणे . 10.00 लक्ष, महात्मा फुले शाळा ते पालदेवार यांच्या घरापर्यंत वसंतनगर ते बाबानगर रस्ता डांबरीकरणे करणे . 50.00 लक्ष, मगणपुरा भाटीया कॉम्प्लेक्स ते मराठा हॉटेल पर्यंत हॉटमिक्स रस्ता करणे रु. 5.00 लक्ष, बाबानगर येथील गणपती मंदीर येथे टिनशेड उभारणे रुपये 25.00 लक्ष, प्रभाग क्रं.३० मध्ये हातजोडी येथील ब्राम्हण घाट येथे सी. सी. रस्ता व घाट विकसित करुन सुशोभिकरण करणे रुपये 20.00 लक्ष, प्रभाग क्रं. १५ मध्ये इंदीरा गांधी मैदानाच्या बाजुला असलेल्या पाण्याच्या टाकी लगत असलेल्या जागे मध्ये मंगल कार्यालय बांधणे रु 50.00 लक्ष, श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम लगत फुड पार्क विकसीत करणे रुपये 50.00 लक्ष, स. सदस्यांच्या शिफारशीसह भांडवली जमामधुन प्रत्येक प्रभागात विकास कामे करणे. ६०.०० लक्ष तसेच प्रभाग क्रं. ७ मध्ये ९०.०० लक्ष. असे एकूण 258000000/-, रोड नं. ४४ मध्ये सांगवी ते शिवमंदीर रस्त्याच्या दुतर्फी झाडे लावणे व सुशोभिकरण करणे रुपये 50.00 लक्ष, तरोडा खु. येथील बि.अन्ड सी. कालोनी मधील मोकळया जागेत उद्यान विकसीत करणे रुपये 50.00 लक्ष,

मालमत्ता करासाठी शैक्षणिक संस्थाना एक समान कर प्रणाली लागु करणे.

मालमत्ता कराची सुट व शास्तीची योजना जसाच्या तसेच मान्य करण्यात येते

थकबाकी वरील शास्ती ५० टक्के सुट मे-२०१७ आखेर पर्यंत राहील

मनपा सार्वत्रिक निवडणूक बेबाकी प्रमाणपत्रासाठी रु. १००/- ऐवजी ५००/- रुपये मंजुर करण्यास हि मनपा विशेष अंदाजपत्रकीय सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.०१** **ठराव**

स्थायी समिती, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने दिनांक १७.०३.२०१७ ठराव क्रं. १४५ अन्वये शिफारस केलेले सालसन २०१६-२०१७ चे सुधारीत अर्थसंकल्पजसेच्या तसे हि नांवामनपा विशेष सभा सर्वानुमते मंजुर करते,

तसेच स्थायी समितीने शिफारस केलेले सन २०१७-२०१८ चे मुळ अर्थसंकल्पात खालील दर्शविण्यात आल्या प्रमाणे विविध शिर्षकात दुरुस्ती व फेरफार सुचवून स्थायी समितीने शिफारस केलेल्या उर्वरीत अर्थसकल्पास तसेच आयुक्तांच्या प्रस्तावास जसेच्या तसे ही नावाशमनपाकेची विशेष सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सालसन २०१७-२०१८ चे मुळ अर्थसंकल्प जमा बाजु**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | आयुक्तांनी सुचवलेली तरतुद | स्थायी समितीने सुचवलेली तरतुद | महानगरपालिका विशेष सभेने केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|
| १ | शासनाचे विशेष अनुदान | ०० | १५,००,००,०००/- | २८,१५,००,०००/- |

**सालसन २०१६-२०१७ चे मुळ अर्थसंकल्प खर्च बाजू**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मा. आयुक्तांनी सूचविलेली तरतुद | स्थायी समितीने सूचविलेली तरतुद | महानगरपालिका विशेष सभेने केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | ग्लोबल वार्मींगविषयी जागृती करणेकरीता विविध उपक्रमांसाठी तरतूद (जसे ना-वाहन दिवस, जनजागृतीवर होर्डीग्ज, डिजीटल बोर्डस इत्यादि) | ०० | ०० | ५०,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | महिलांना रात्रीचे वेळी घरी पोचविण्यासाठी बसस्थानक व रेल्वेस्टेशन येथे महापालिकेतर्फे वाहन व कर्मचारी यांची व्यवस्था करणे. | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ३ | महिलांना अटो प्रशिक्षण व अटो खरेदी करणेसाठी तरतूद | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ४ | माहे मे महिन्यात नांदेड शहरात रेन वॉटर हॉर्वेस्टींग योजना राबविणे. | ०० | ०० | १,००,००,०००/- |
| ५ | शहरामध्ये विविध भागात वृक्षारोपण करणे. | ०० | ०० | १,००,००,०००/- |
| ६ | महानगर पालिकांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या दृष्टीने अद्यावत सुविधा पुरवीणेसाठी व स्पर्धात्मक परिक्षेसाठी तरतूद | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ७ | शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महानगर पालिकेच्या विविध हॉस्पीटल्समध्ये अद्यावत सुविधा पुरविणे व जेनरीक औषधे उपलब्ध करुन देणेसाठी तरतूद | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ८ | हैदरबाग येथील दवाखाण्यामध्ये साहित्य खरेदी करणे. | ०० | ०० | १,००,००,०००/- |
| ९ | सिडको भागात नाटयगृह उभारणे. | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| १० | वाडीया/ घामोडीया/ बोरबन इत्यादि भागात धर्मशाळा बांधणे. | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ११ | आठवडी बाजारातील भाजीपाला कच-यावर प्रक्रीया (सिडको, गोकुळनगर, इतवारा) प्रकल्प उभारणे. | ०० | ०० | २०,००,०००/- |
| १२ | डंकीन येथे वॉटर पार्क उभारणे. | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| १३ | मनपाच्या पाण्याच्या टाक्यांवर P.P.P. तत्वावर R.O. मशिन्स बसवून शुध्द पाण्याचा पुरवठा करणे. | ०० | ०० | १,००,००,०००/- |
| १४ | शहरातील 10 खुल्या जागांवर क्रिडांगण विकसित करणे. | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| १५ | राष्ट्रपुरुषांची पुतळे देखभाल, सावित्रीबाई फुले – महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहु महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रतापसिंह व हरीत क्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांचे पुतळे उभारणे, तसेच तथागत भगवान गौतम बुध्दांची पुर्णाकृती मुर्ती बसविणे व इतर पुतळे उभारणे. **(महाराष्ट्र शासनाच्या निधीतुन तरतुद न झाल्यास मनपा निधीतून)** (रु.3 कोटी)<br>2) महात्मा बसवेश्वर यांचा अश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभीकरण करणे (रु.2 कोटी) | २,००,००,०००/- | ४,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| १६ | लिंगायत स्मशानभुमी विकसीत करणे. | २५,००,०००/- | २५,००,०००/- | ५०,००,०००/- |
| १७ | शिक्षण,महिला व बालकल्याण समितीकरीता खालील तरतुद करणे.<br>1) महिला बचत गट मेळावा, शॉपिंग महोत्सव (रु.2 लक्ष)<br>2) कै. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमीत्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार (रु.2 लक्ष)<br>3) कपाट व बेंचेस (रु.25 लक्ष)<br>4) शिलाई मशिन (रु.15 लक्ष)<br>5) आरोग्य विषयक परिसंवाद (रु.1 लक्ष)<br>6) ज्येष्ठ नागरीकांचा महिला आरोग्य शिबीर (रु.15 लक्ष)<br>7) बालदिन/बालमेळावा/बालचित्रपट महोत्सव (रु.5 लक्ष)<br>8) जागतिक महिला दिन (रु.3 लक्ष)<br>9) जनजागृती व लोकशिक्षण (रु.5 लक्ष)<br>10) जलतरण प्रशिक्षण महिलांसाठी (रु.2 लक्ष)<br>इतर महिला सबलीकरणाच्या विविध योजना (रु.10 लक्ष) | ०० | ०० | ८५,००,०००/- |
| १८ | प्रभाग क्रं.21 अक्सिस बँक ते एनटीसी मिलपर्यंत सीसी रस्ता तयार करणे. | ०० | ०० | ५५,००,०००/- |
| १९ | प्रभाग क्रं.21 डॉ. सुनिल कदम ते रेल्वे स्टेशन पर्यंत सीसी रस्ता करणे. | ०० | ०० | २५,००,०००/- |
| २० | प्रभाग क्रं.21 बिकानेर स्वीट ते रेल्वे स्टेशनपर्यंत (डॉक्टरलेन मधील) सीसी रस्ता तयार करणे. | ०० | ०० | २५,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | प्रभाग क्रं. 36 मध्ये रहीमपुर, शंकरनगर, भाग्योदयनगर, न्यायनगर भागात रस्ते, नाली व मलनि: स्सारण वाहिनी व ईतर मुलभूत सुविधा उपलब्ध करणेसाठी | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| २२ | प्रभाग क्रं.29 मध्ये चौफाळा भागात पोलिस चौकीच्या पाठीमागे मनपाच्या मोकळया जागेत व्यापारी संकुल व व्यायामशाळा बांधणे. | ०० | ०० | ३०,००,०००/- |
| २३ | प्रभाग क्रं. 16 मध्ये विविध मुलभूत विकासाची कामे करणे. (रु. 80.०० लक्ष) | ०० | ०० | ८०,००,०००/- |
| २४ | चुनाल नाल्यावर समिराबागला जाणा-या रोडवर बॉक्स टाईप कल्व्हेट तयार करणे. | ०० | ०० | ७५,००,०००/- |
| २५ | पंचशिलनगर मध्ये चुनाल नाल्यावर बॉक्स टाईप कल्व्हेट तयार करणे. | ०० | ०० | ४५,००,०००/- |
| २६ | तहुराबाग मध्ये रोड व नाली तयार करणे | ०० | ०० | २५,००,०००/- |
| २७ | बरकतपुरा भागामध्ये रोड व नाली तयार करणे. | ०० | ०० | २५,००,०००/- |
| २८ | समिराबाग मध्ये रोड व नाली तयार करणे. | ०० | ०० | ३०,००,०००/- |
| २९ | खडकपुरा भागामध्ये मुख्य रस्ता करणे. | ०० | ०० | २०,००,०००/- |
| ३० | शहरातील विविध भागातील स्मशानभुमी, विकास व भुसंपादन अंतर्गत राजस्थानी समाजासाठी 10000 स्क्वे.फुट जागा व त्याच्या विकासासाठी व संरक्षण भिंत बांधणेसाठी | ०० | ०० | १,००,००,०००/- |
| ३१ | अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळयासाठी | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ३२ | मगनपुरा ओपन स्पेस मनपा जागेत इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणे व इमारत बांधकामासाठी | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ३३ | सखल भागात पावसाच्या पाण्याचा निचरा अंतर्गत वसंतनगर भागामध्ये नाला रुंदीकरण व स्लॅब करणे. | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ३४ | महानगरपालिका गणेशोत्सव, भंडारा व दिपावलीचे पानसुपारी करीता | ०० | ०० | ५,००,०००/- |
| ३५ | नवा मोंढा मैदानात हायमास्ट टाकणे | ०० | ०० | १०,००,०००/- |
| ३६ | महात्मा फुले शाळा ते पालदेवार यांच्या घरापर्यंत वसंतनगर ते बाबानगर रस्ता डांबरीकरणे करणे. | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ३७ | मगणपुरा भाटीया कॉम्प्लेक्स ते मराठा हॉटेल पर्यंत हॉटमिक्स रस्ता करणे. | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ३८ | बाबानगर येथील गणपती मंदीर येथे टिनशेड उभारणे | ०० | ०० | २५,००,०००/- |
| ३९ | प्रभाग क्रं.३० मध्ये हातजोडी येथील ब्राम्हण घाट येथे सी. सी. रस्ता व घाट विकसित करुन सुशोभिकरण करणे | ०० | ०० | २०,००,०००/- |
| ४० | प्रभाग क्रं. १५ मध्ये इंदीरा गांधी मैदानाच्या बाजुला असलेल्या पाण्याच्या टाकी लगत असलेल्या जागे मध्ये मंगल कार्यालय बांधणे | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ४१ | श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम लगत फुड पार्क विकसीत करणे | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ४२ | स. सदस्यांच्या शिफारशीसह भांडवली जमामधुन प्रत्येक प्रभागात विकास कामे करणे. ६०.०० लक्ष तसेच प्रभाग क्रं. ७ मध्ये ९०.०० लक्ष. | ०० | ३४,४०,००,०००/- | २५,८०,००,०००/- |
| ४३ | रोड नं. ४४ मध्ये सांगवी ते शिवमंदीर रस्त्याच्या दुतर्फी झाडे लावणे व सुशोभिकरण करणे | ०० | ०० | ५०,००,०००/- |
| ४४ | तरोडा खु. येथील बि.अन्ड सी. कालोनी मधील मोकळया जागेत उद्यान विकसीत करणे | ०० | ०० | ५०,००,०००/- |

- मालमत्ता करासाठी शैक्षणिक संस्थाना एक समान कर प्रणाली लागु करणे.
- मालमत्ता कराची सुट व शास्तीची योजना जसाच्या तसेच मान्य करण्यात येते
- थकबाकी वरील शास्ती ५० टक्के सुट मे-२०१७ आखेर पर्यंत राहील
- मनपा सार्वत्रिक निवडणूक बेबाकी प्रमाणपत्रासाठी रु. १००/- ऐवजी ५००/- रुपये मंजुर करण्यास हि मनपा अर्थसंकल्पीय विशेष सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सभागृहनेता** अर्थसंकल्पीय विशेष सर्वसाधारण सभेत ठराव क्रं ०१ पारीत झालेला असुन त्यामध्ये मालमत्ता करासाठी शैक्षणिक संस्थांना एक समानकर प्रणाल लागु करणे, तसेच मालमत्ता कराची सुट व शास्तीची योजना तसाच्या तसेच मान्य करण्यात येते असा ठराव पारीत करण्यास मान्यता देण्यात आलेली असुन **त्या ऐवजी शैक्षणिक संस्थांना न्यायालयाच्या निर्णया प्रमाणे मालमत्ता कर वसुल करु नये व मालमत्ता कराच्या थकबाकी शास्ती वरील शास्ती २४ टक्के ऐवजी १२ टक्क्याने वसुल करण्या बाबतची अशी दुरुस्ती करुन त्यानुसार कार्यवाही करण्यास ही मान्यता देण्यात बाबतचा ठराव पारीत करण्यात यावी अशी माझी विनंती आहे**

**अ. सत्तार** सभागृहनेता यांनी जो ठरावात दुरुस्तीचा प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** सभागृहनेता यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.०२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय विशेष सर्वसाधारण सभेत ठराव क्रं ०१ मध्ये मालमत्ता करासाठी शैक्षणिक संस्थांना एक समानकर प्रणाल लागु करणे, तसेच मालमत्ता कराची सुट व शास्तीची योजना तसाच्या तसेच मान्य करण्यात येते असा ठराव पारीत करण्यात आला होता. **त्या ऐवजी शैक्षणिक संस्थांना न्यायालयाच्या निर्णया प्रमाणे मालमत्ता कर वसुल करु नये व मालमत्ता कराच्या थकबाकी शास्ती वरील शास्ती २४ टक्के ऐवजी १२ टक्क्याने वसुल करण्या बाबतची अशी दुरुस्ती करुन त्यानुसार कार्यवाही करण्यास ही मनपा विशेष सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**महापौर** आजच्या अंदाजपत्रकिय विशेष सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते

**शेवटी राष्ट्रगीत महणण्यात येईल.**

**शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.**

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| नावाशमनपा नांदेड | नावाशमनपा नांदेड |